गुरुवार दि. १८ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २८७ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जेवेरूनहुता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

अमृत १.० अंतर्गत भुयारी गटार योजनेसाठी मनपाची कारवाई

## रामतीर्थ स्मशान भूमीसमोरील अतिक्रमणे हटवली

### ट्रंक मेन लाईनच्या कामातील अडथळे दूर; पुन्हा अतिक्रमण करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा इशारा

**जालना -प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'अमृत १.०' ( १.०) अभियानांतर्गत जालना शहरात राबविण्यात येत असलेल्या भुयारी गटार योजनेच्या कामाला गती देण्यासाठी जालना महानगरपालिकेने बुधवारी (दि. १७ जून) धडक अतिक्रमण निष्कासन मोहीम राबविली. रामतीर्थ स्मशानभूमीसमोरील छत्रपती संभाजीनगर-जालना महामार्गालगत असलेल्या अनधिकृत अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली.





महानगरपालिका प्रशासनाच्या माहितीनुसार, शहरातील सांडपाणी व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी आणि भविष्यातील नागरी गरजा लक्षात घेऊन भुयारी गटार योजनेअंतर्गत महत्त्वपूर्ण 'ट्रंक मेन लाईन' टाकण्याचे काम सुरू आहे. मात्र, संबंधित मार्गावर झालेल्या अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांमुळे या कामात अडथळे निर्माण होत होते. त्यामुळे सार्वजनिक हिताचा आणि शहराच्या दीर्घकालीन विकासाशी संबंधित असलेल्या या प्रकल्पाच्या कामात विलंब होत असल्याने प्रशासनाने अतिक्रमण हटविण्याचा निर्णय घेतला. पोलीस बंदोबस्तात राबविण्यात आलेल्या या मोहिमेदरम्यान संबंधित अतिक्रमणे हटविण्यात आली. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस विभागाचे विशेष सहकार्य घेण्यात आले होते.

**शहरभर अतिक्रमणविरोधी मोहीम सुरूच राहणार**

महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शहरातील वाहतूक कोंडी कमी करणे, रस्ते रुंदीकरणास गती देणे, पावसाळ्यातील पाणी निचऱ्याची व्यवस्था सक्षम करणे आणि सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त करणे या उद्देशाने अतिक्रमण हटविण्याची मोहीम पुढील काळातही नियमितपणे सुरू राहणार आहे.

सध्या शहरातील विविध भागांतील अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, नागरिकांनी व व्यावसायिकांनी स्वखर्चाने व स्वयंस्फूर्तीने रस्ते, पदपथ, नाले आणि सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणे काढून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**पुन्हा अतिक्रमण केल्यास कठोर कारवाई**

महानगरपालिका प्रशासनाने अतिक्रमणधारकांना कठोर इशारा दिला आहे. एकदा हटविण्यात आलेल्या जागेवर पुन्हा अनधिकृत बांधकाम किंवा अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाईबरोबरच थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शहर विकासाच्या कामांमध्ये अडथळे निर्माण करणाऱ्या कोणत्याही प्रकाराला पाठीशी घातले जाणार नसल्याचा संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मोहीम**

महानगरपालिका आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांच्या आदेशानुसार उपायुक्त त्र्यंबक कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यावेळी सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर, स्वच्छता निरीक्षक शोएब खान, शुभम जाधव, राहुल हिवाळे यांच्यासह महापालिकेचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. तसेच पोलीस विभागानेही मोहिमेसाठी आवश्यक बंदोबस्त व सहकार्य उपलब्ध करून दिले.

**शहर विकासासाठी महत्त्वाचा टप्पा**

अमृत १.० अभियानांतर्गत सुरू असलेली भुयारी गटार योजना पूर्ण झाल्यानंतर शहरातील सांडपाणी व्यवस्थापनात सुधारणा होण्यास मदत होणार असून, पर्यावरणीय दृष्टीनेही हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे.

त्यामुळे या प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जागा उपलब्ध करून देणे आणि अडथळे दूर करणे ही प्रशासनाची प्राथमिकता असल्याचे या कारवाईवरून स्पष्ट होत आहे.



**जालना । प्रतिनिधी**

जालना येथील प्रसिद्ध उद्योगपती, समाजसेवक आणि धर्मप्रेमी कालिका स्टीलचे संचालक घनश्यामदास गोयल यांची अखिल भारतीय अग्रवाल सम्मेलनच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. याबद्दल दैनिक बदलता महाराष्ट्रचे संपादक मनोज कोलते पाटील यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी व्यवस्थापक माजी सैनिक सुनील नरवडे, कपिल खरात, दत्ता कोलते आदींची उपस्थिती होती.

जालन्यात स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

## धारदार तलवार व खंजीर बाळगणारे दोन युवक जेरबंद

अवैध शस्त्रांविरोधातील मोहिमेला वेग; दोन स्वतंत्र गुन्हे दाखल, तलवार व खंजीर जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तींविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेदरम्यान जालना स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) बुधवारी (दि. १७ जून) दोन स्वतंत्र कारवाया करून धारदार तलवार आणि खंजीर बाळगणाऱ्या दोन युवकांना ताब्यात घेतले. या कारवाईत एक तलवार आणि एक खंजीर जप्त करण्यात आला असून दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू आणि अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांनी स्थानिक गुन्हे शाखेला विशेष सूचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करून माहिती संकलन आणि पडताळणीचे काम सुरू होते.

**गुप्त माहितीच्या आधारे पहिली कारवाई**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, बालाजीनगर- गांधीनगर परिसरातील जयेश किशोरसिंग राजपूत (वय २१) हा आपल्या ताब्यात अवैधरित्या धारदार आणि तीक्ष्ण तलवार बाळगून आहे.

माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलिसांनी तत्काळ त्याच्या राहत्या घरावर कारवाई केली. झडतीदरम्यान आरोपीच्या ताब्यातून सुमारे १,५०० रुपये किंमतीची धारदार तलवार जप्त करण्यात आली. याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५२२/२०२६ नोंदविण्यात आला असून भारतीय हत्यार कायद्याच्या *(पान २ वर)*

## एकनाथराव शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी महिलांनी पदर खोचून कामाला लागावे : खा. ज्योतीताई वाघमारे

शिवसेनेच्या शिवदुर्गा संवाद मेळाव्यास महिलांचा मोठा प्रतिसाद

**जालना - प्रतिनिधी**

राजकारणात मागितल्याशिवाय काही मिळत नाही असा सध्याचा काळ आहे. देवालाही काही मागायचे असेल तर नवस बोलावा लागतो; पण माझ्यासारख्या एका सामान्य घरातील महिलेला खासदारकी देऊन देशाच्या सर्वोच्च सभागृहात पाठविणारे एकनाथराव शिंदे हे खरे देवमाणूस आहेत. महिलांसाठी लाडक्या बहिणीसह विविध योजना राबविणारे एकनाथराव शिंदे यांना २०२९ च्या निवडणुकीत पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी सर्व महिलांनी पदर खोचून कामाला लागावे असे आवाहन खासदार ज्योतीताई वाघमारे यांनी केले.




शिवसेनेच्या शिवदुर्गा संवाद दौरा कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर शिवसेनेच्या प्रवक्त्या शायना एन.सी., माजी आमदार संगीता ठोंबरे, उपनेत्या कला शिंदे, विजया पोटे, प्रीती बंड तसेच नगरसेविका दर्शना खोतकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

जालना, भोकरदन आणि बदनापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या आजी-माजी पदाधिकारी आणि शिवसेनेच्या महिला कार्यकर्त्यांच्या सोबत प्रत्यक्ष संवाद साधल्यानंतर आपल्या प्रमुख भाषणात बोलताना खासदार वाघमारे म्हणाल्या की, बऱ्याच कार्यक्रमात नेते येतात, बोलतात आणि निघून जातात. कार्यकर्त्यांना खुर्च्या आणि सतरंज्या उचलण्याचे काम करावे लागते. परंतु शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथराव शिंदे यांनी सामान्य कार्यकर्त्यांसोबत बोलले पाहिजे, त्यांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे आणि त्यांचे प्रश्न प्रत्यक्षात सोडविले पाहिजे, म्हणून हा शिवदुर्गा संवाद आयोजित केला आहे. राज्यातील या शिवसंवाद दौऱ्याची सुरुवात जालना येथून होत आहे. शाखाप्रमुख ते मुख्यमंत्री असा प्रवास केलेल्या आमचे नेते एकनाथराव शिंदे यांनी कार्यकर्ते बोलले पाहिजे आणि नेत्यांनी ऐकले पाहिजे या भूमिकेतून शिवदुर्गा संवाद *(पान २ वर)*

शिवसेनेच्या युवा नेत्या तथा नगरसेविका दर्शनाताई खोतकर म्हणाल्या की, एक काळ असा होता की पदावर महिला आणि काम पती पाहायचे. आता मात्र महिला पुढे येऊ लागल्या आहेत. एका हाकेवर आजच्या शिवदुर्गा संवादासाठी मोठ्या संख्येने महिला आल्या आहेत. शिवसेनेने महिलांसाठी खूप योजना राबविलेल्या आहेत. त्यापैकी लाडकी बहीण ही स्टार योजना गेमचेंजर ठरली आहे. आ. अर्जुनभाऊ खोतकर यांनी लाडक्या बहिणी योजनेचा जिल्ह्यातील सर्वाधिक महिलांना लाभ मिळवून दिला आहे. नगरविकास खाते शिवसेनेकडे असूनही जालना पालिकेत शिवसेनेच्या नगरसेवकांकडे दुर्लक्ष होत असल्याचेही निदर्शनास आणून दिले. आगामी काळात जालना जिल्ह्यात महिला संघटना बळकट झालेली दिसेल, असे काम करू अशी ग्वाही दर्शनाताई खोतकर यांनी दिली.

माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी मोठ्या संख्येने आलेल्या महिलांचे स्वागत करताना सांगितले की, लाडक्या बहिणींसह विविध लाभाच्या योजना महिलांसाठी राबविणारे, त्यांचा सन्मान करणारे एकनाथराव शिंदे यांच्यावर महिलांचे विशेष प्रेम आहे. महिलांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठीच त्यांनी शिवदुर्गा संवाद दौरा सुरू केला आहे. त्याची सुरुवातही आपल्या जिल्ह्यातूनच केली आहे. शिवसेनेच्या वरिष्ठ महिला नेत्या जालन्यात आल्या आहेत. त्यांचा राज्यातील दौरा संपल्यानंतर राज्यातील सर्व महिलांचा एक नवदुर्गा संवाद मेळावा नवरात्रीच्या सुमारास मुंबईत मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत घेण्याबाबत आपण त्यांना विनंती करणार आहोत, असे सांगितले.

## गोटपॉक्स लसीकरणः पहिल्या टप्प्यात ३७५२ लाख समात्राचे वाटप

*टाट मोहीम गतिमान करण्याचे आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांचे आवाहन*

**जालना -प्रतिनिधी**

राज्यातील गायवर्ग पशुधनाला लम्पी चर्मरोगापासून सुरक्षित ठेवण्यासाठी सन २०२६-२७ या वर्षाकरिता आवश्यक असलेल्या गोटपॉक्स लसमात्रांचे उत्पादन पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे सुरू झाले आहे. २१ व्या पशुगणनेनुसार राज्यातील जिल्ह्यानिहाय गायवर्ग पशुधनाची संख्या विचारात घेऊन, पहिल्या टप्प्यात एकूण लस उत्पादनाच्या ४० टक्के ३७ लाख ५२ हजार लसमात्रांचे वाटप नियोजनबद्ध रीतीने सुरू करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यातील पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहीम युद्धपातळीवर व तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे या संस्थेने आवश्यक लसमात्रांचे उत्पादन यशस्वीपणे केले आहे. सर्व जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय यांनी पुरवण्यात आलेली लस क्षेत्रीय स्तरावर वेळेत पोहोचवताना तिची शीत साखळी कुठेही खंडित होणार नाही, याची काटेकोर दक्षता घ्यावी, गोटपॉक्स लसमात्रा प्राप्त होताच जिल्ह्यातील अधिक दूध देणाऱ्या व उच्च उत्पादनक्षमता असलेल्या पशुंचे प्राधान्याने लसीकरण करण्यात यावे, लसीकरणाच्या विहित नमुन्यातील बिनचूक आणि एकत्रित दैनंदिन अहवाल दररोज सकाळी ११ वाजेपर्यंत विभागनिहाय संस्थेकडे सादर करावा; अशा सूचना पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे या संस्थेचे *(पान २ वर)*

## संपादकीय...

# लाचखोरीची किंमत फक्त चार हजार रुपये की व्यवस्थेवरील विश्वास?

जालना सार्वजनिक बांधकाम विभागातील एका स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाला अवघ्या चार हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडल्याची घटना ही केवळ एका कर्मचाऱ्यावरील कारवाई म्हणून पाहून चालणार नाही. या घटनेमागे शासन व्यवस्था, प्रशासकीय कार्यपद्धती आणि सर्वसामान्य नागरिकांच्या मानसिकतेशी संबंधित अनेक गंभीर प्रश्न दडलेले आहेत.

विशेष म्हणजे या प्रकरणातील तक्रारदार हा एक सुशिक्षित बेरोजगार युवक आहे. शिक्षण पूर्ण करून रोजगाराच्या संधी शोधणाऱ्या तरुणाला शासनाने उपलब्ध करून दिलेल्या परवान्यासाठीच जर लाचेची मागणी होत असेल, तर ही बाब अधिक चिंताजनक ठरते. रोजगाराच्या शोधात असलेल्या युवकाला प्रशासनाच्या दारात आर्थिक अडथळे उभे राहतात, ही कोणत्याही लोकशाही व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे.

लाचखोरीची रक्कम चार हजार रुपये होती, पण प्रत्यक्षात नुकसान किती मोठे आहे? ती रक्कम कदाचित कमी वाटू शकते; मात्र अशा प्रत्येक घटनेमुळे नागरिकांचा शासन यंत्रणेवरील विश्वास कमी होत जातो. एखादे काम नियमांनुसार आणि पात्रतेच्या आधारे होण्याऐवजी पैशांच्या आधारे होत असल्याची भावना निर्माण झाली, तर भ्रष्टाचाराची मुळे आणखी खोलवर रुजतात.

या घटनेत एसीबीने सापळा रचून कारवाई केली, हे निश्चितच कौतुकास्पद आहे. मात्र प्रत्येक वेळी एसीबीची कारवाई होईपर्यंत थांबावे लागणार का? संबंधित विभागांमध्ये अंतर्गत नियंत्रण व्यवस्था किती प्रभावी आहे? वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कामकाजावर नियमित देखरेख होते का? नागरिकांच्या तक्रारींवर वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने कार्यवाही होते का? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.

आज बहुतांश शासकीय प्रक्रिया ऑनलाइन होत असल्याचा दावा केला जातो. अर्ज ऑनलाइन, कागदपत्रे ऑनलाइन आणि पडताळणीची व्यवस्था डिजिटल असतानाही प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन 'सुविधा शुल्क' किंवा 'चहा-पाणी'च्या नावाखाली पैशांची मागणी होत असेल, तर डिजिटल यंत्रणेचा उद्देश कितपत साध्य होत आहे, याचाही विचार करावा लागेल.

याहून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अशा घटना अपवाद आहेत की व्यवस्थेतील मोठ्या समस्येचे संकेत? एखादा कर्मचारी पकडला गेला की बातमी होते; मात्र अनेक नागरिक भीतीपोटी किंवा काम अडेल या चिंतेने तक्रार करण्याचे टाळतात. त्यामुळे प्रत्यक्षात किती प्रकरणे घडत असतील, याचा विचारही अस्वस्थ करणारा आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाया आवश्यक आहेतच; पण त्यासोबत विभागीय स्तरावर जबाबदारी निश्चित करणे, कामकाजाची पारदर्शकता वाढवणे, ऑनलाइन ट्रॅकिंग व्यवस्था प्रभावी करणे आणि भ्रष्टाचाराविरुद्ध शून्य सहनशीलतेची भूमिका घेणे तितकेच गरजेचे आहे.

कारण प्रश्न केवळ चार हजार रुपयांचा नाही. प्रश्न आहे तो एका सुशिक्षित युवकाच्या हक्काचा, प्रशासनाच्या विश्वासार्हतेचा आणि भ्रष्टाचारमुक्त शासनव्यवस्थेच्या दाव्यांचा. एसीबीची ही कारवाई एका व्यक्तीवर झाली असली, तरी तिचा संदेश संपूर्ण व्यवस्थेसाठी आहे. जनतेच्या हक्कांवर लाचखोरीचे सावट राहणार असेल, तर विकासाच्या दाव्यांना अर्थ उरत नाही.

# फ्लाईंग शीख मिल्खा सिंग!

भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांचा आज स्मृतिदिन. १८ जून २०२१ रोजी मिल्खा सिंग यांचे निधन झाले होते. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. २०२१ सालीच त्यांच्या पत्नीचे कोरोनाने निधन झाले. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटू आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष जनरल आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले. ही स्पर्धा पाहण्यासाठी जनरल आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच जनरल आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला. या चित्रपटात फरहान अख्तर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे पाच वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# पान १ व ४ वरुन....

## जालन्यात स्थानिक

कलम ४ व २५ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

**दुसऱ्या कारवाईत खंजीर जप्त**

पहिल्या कारवाईनंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला आणखी एक महत्त्वाची माहिती मिळाली. जामवाडी रोड परिसरातील गणेश रेसिडेन्सी येथे राहणारा केशव किशोर बोरुडे (वय २१) हा अवैधरित्या धारदार खंजीर बाळगत असल्याचे समोर आले.

यानंतर पोलिसांनी लाहोटी फार्म हाऊस परिसरातील गणेश रेसिडेन्सी येथे जाऊन कारवाई केली. तपासणीदरम्यान आरोपीच्या ताब्यातून सुमारे १,००० रुपये किंमतीचा धारदार व तीक्ष्ण खंजीर जप्त करण्यात आला. या प्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३७४/२०२६ दाखल करण्यात आला असून भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ४ व २५ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

**गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रणासाठी विशेष मोहीम**

जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी आणि सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने अवैध शस्त्रांविरोधात विशेष मोहीम सुरू केली आहे. परवानगीशिवाय धारदार शस्त्रे बाळगणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे धोरण पोलिसांनी अवलंबले असून, अशा व्यक्तींवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे.

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, अवैध शस्त्रे बाळगल्यामुळे गंभीर गुन्ह्यांना खतपाणी मिळण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा प्रकारच्या कारवाया भविष्यातही सुरू राहणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

**पथकाची उल्लेखनीय कामगिरी**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार गोपाल गोशिक, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, शिवप्रसाद एखंडे, संदीप चिंचोले, रमेश काळे आणि कैलास चेके यांनी या यशस्वी कारवाईत सहभाग घेतला. जिल्ह्यातील अवैध शस्त्रधारकांविरोधातील ही कारवाई महत्त्वाची मानली जात असून, त्यामुळे अशा प्रवृत्तींना पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे.

## एकनाथराव शिंदे...

दौऱ्याची संकल्पना मांडली. आम्ही फक्त पोस्टमनच्या भूमिकेत आहोत. संघटना वाढीसाठी महिला कार्यकर्त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न आणि सूचना याचा तपशीलवार अहवाल आम्ही आपले नेते एकनाथराव शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकडे सुपूर्द करणार आहोत. याआधी संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे यांनी भर उन्हाळ्यात ४५ डिग्री तापमान असताना महाराष्ट्राचा शिवसंवाद दौरा केला आणि कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. राज्यातील महिलांचेही प्रश्न, समस्या ऐकून घेण्यासाठी आम्हाला तुमच्याकडे पाठविले आहे. आम्ही फक्त पोस्टमनच्या भूमिकेत आहोत. एकनाथराव शिंदे यांनी सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेचा महाराष्ट्रातील अडीच कोटी महिलांनी लाभ घेतला. याशिवाय लेक लाडकी योजना, मोफत एसटी, अशा कितीतरी योजना महिलांसाठी राबविल्या आहेत. महिलेने नऊ महिने पोटात बाळ वाढवायचे त्याचे पालनपोषण करायचे परंतु त्या बाळाच्या नावापुढे नाव लागत होते ते वडिलांचे! या प्रकाराची संवेदनशील दखल घेत एकनाथराव शिंदे यांनी बाळाच्या नावापुढे आधी आईचे आणि नंतर वडिलांचे नाव लावायचे हा ऐतिहासिक निर्णय घेतला, याकडे खासदार वाघमारे यांनी विशेष लक्ष वेधले. पुढील काळात महिलांसाठी विधानसभा, लोकसभेत आरक्षण असणार आहे. त्यामुळे महिलांनी शाखा स्थापन करणे, सदस्य नोंदणी करणे, बूथ याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पक्ष विस्तार करताना कुणाचा दबाव येत असेल, कुणी दडपशाही करीत असेल तर त्याचा बंदोबस्त कसा करायचा हे शिवसैनिकाला सांगण्याची गरज नाही. जालन्यात अर्जुनभाऊ खोतकर यांचे काम उत्तम असल्याची आज प्रचिती आली आहे. महिलांचे कल्याण आणि सन्मान करणारे एकनाथराव शिंदे यांना २०२९ च्या निवडणुकीत पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी महिलांनी पदर खोचून कामाला लागावे असे आवाहन केले.

यावेळी शायना एनसी यांनी भोकरदन विधानसभा मतदारसंघात पक्ष वाढविण्याचे आवाहन केले. माजी आमदार संगीताताई ठोंबरे, उपनेत्या कला ताई शिंदे, विजयाताई पोटे, प्रीतीताई बंड यांनीही उपस्थित महिलांच्या प्रश्नांना उत्तरे देत संघटना वाढीसाठी विशेष सूचना केल्या. महिलांनी उपस्थित केलेले प्रश्न

आजच्या शिवदुर्गा संवाद मेळाव्यात महिला कार्यकर्त्या व पदाधिकाऱ्यांनी विविध प्रश्न उपस्थित केले. त्यात बचत गटासाठी गावात जागा उपलब्ध करून देणे, बचत गटांनी निर्माण केलेल्या वस्तू शासनाने खरेदी करणे, धुनी,भांडी करणाऱ्या महिलांसाठी विशिष्ट मदतीची योजना राबविणे, जिल्हा नियोजन समिती मार्फत महिलांनाही विविध विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देणे, बचत गटाच्या वस्तूंसाठी शहरात मॉल उभा करणे, महिलांचे आर्थिक बळकटीकरण करावे अशा सूचना आणि समस्या यावेळी उपस्थित करण्यात आल्या. यात दर्शनाताई झोल कालिंदीताई ढगे, कमलताई तुल्ले, तृप्ती कोठारी, आशाताई भुतेकर, वंदना संघपाल, सविता किवंडे,ज्योती म्हस्के, विजयाताई चौधरी, वर्षा शिंदे, छाया कोळे, ममता खरात,चंदा शिंदे , उज्वला फोपलीया मुक्ताबाई महादू गीते, कविता शिंदे, सुजाता भोसले,चंदा शिंदे, पूजा दिनेश भगत, पुजा योगेश भगत, सत्यभामा जाधव, उषाताई पांगारकर,सरलाताई जो हजारे अनिता वानखेडे, रोहिणी पिंपळे इत्यादी महिलांनी आपले म्हणणे मांडले. या कार्यक्रमास.शिवसेना उपनेते आमदार अर्जुनराव खोतकर भास्करराव अंबेकर, अभिमन्यू खोतकर, पंडितराव भुतेकर, भाऊसाहेब घुगे, संतोष मोहिते,अमोल ठाकूर,भगवानराव अंभोरे, गणेशराव मोहिते,अजय कदम, दिनकर घेवंदे,काशिनाथ जाधव, कमलेश खरे, दीपक राठोड दिनेश भगत, निखील पगारे, योगेश भगत, दुर्गेश काठोटीवाले, सगीर पहेलवान , अश्विन अंबेकर,संजय डुकरे,विजय जाधव, पांगारकर किशोर,दिनकर घेवंदे, योगेश रत्नपारखे,गोपी घोंगडे पांडुरंग डोंगरे, नानासाहेब वानखेडे,जनार्दन चौधरी,बाबा मोरे,सचीन देशमुख, विष्णू वाघमारे,नरसिंग गोरे कैलास गिराम, संजय वाघ सुधाकर वाडेकर, राहुल गवारे बाळासाहेब पाचरणे,राम सतकर,आप्पासाहेब उगले,भागवत काळे,संताजी वाघमारे,किरण सिरसाठ, बालु जाधव,सखाराम लंके,लखन कणसे दुर्गा देशमुख, गंगुबाई वानखेडे, निर्मलाताई सुपारकर , गंगासागर जाधव ,गवारे ताई ज्योती मस्के,वारुळे ताई,राधाबाई वाडेकर,शारदा मोहीते ज्योती पाईकराव छाया जर्हाड, आदी उपस्थित होते.

## गोटपॉक्स लसीकरण...

सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याहयाखान पठाण यांनी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांना केल्या आहेत.

**हॉटस्पॉट तालुक्यांवर विशेष लक्ष**

गतवर्षी ज्या तालुक्यांमध्ये लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून आला होता, त्या भागात प्राधान्य क्रमाने लसीकरण मोहीम राबवावी. या व्यापक मोहिमेसाठी जिल्ह्यातील सहकारी दुग्ध संघ, स्वयंसेवी संस्था तसेच खाजगी पशुवैद्यक व सेवादाते यांचे सक्रिय सहकार्य घेण्यात यावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्हास्तरीय यंत्रणेला करण्यात आले आहे.

**पशुधनाच्या सुरक्षिततेला प्राधान्य**

''लंपी चर्मरोगासारख्या () संसर्गजन्य आजारांपासून आपल्या राज्यातील गोधनाची सुरक्षा करणे हे पशुसंवर्धन विभागाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आणि आपल्या शेतकरी बांधवांचा मुख्य कणा आहे. त्यामुळे त्यांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी गोटपॉक्स लसीकरण हाच एकमेव आणि सर्वात प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय आहे. सद्यस्थितीत हा उपाय क्षेत्रीय स्तरावर आम्ही मोहिम स्वरुपात योजत आहोत. पशुपालकांनीही विभागास सहकार्य करावे.

## जालन्यात एलसीबीचा...

सेट यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणी गुन्हा क्रमांक ५२०/२०२६ नोंदविण्यात आला असून, महाराष्ट्र दारुबंदी कायद्यातील कलम ६५ (अ) आणि ६५ (ई) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

**जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधातील मोहीम तीव्र**

जिल्ह्यात अवैध दारू विक्री, वाहतूक, साठवणूक आणि इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधात पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम सुरू केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेकडून सातत्याने अशा प्रकारच्या कारवाया केल्या जात असून, गुन्हेगारी प्रवृत्तींवर नियंत्रण मिळविण्यासाठी पोलिसांनी गुप्त माहिती यंत्रणा अधिक सक्रिय केली आहे.

अवैध दारूची वाहतूक करून शासनाचा महसूल बुडविणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

**पथकाचे विशेष योगदान**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधु आणि अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार लोखंडे, श्रीवास, करतारे, काळे आणि इतर कर्मचाऱ्यांनी या यशस्वी कारवाईत सहभाग घेतला.

जिल्ह्यातील अवैध मद्य व्यवसायाविरोधातील ही अलीकडील काळातील महत्त्वपूर्ण कारवाई मानली जात असून, यामुळे बेकायदेशीर दारू वाहतूक करणाऱ्या टोळ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

## पीएम श्री जिल्हा...

शिक्षण प्राप्त करावे, असे सांगितले. त्यांनी पीएम श्री योजनेअंतर्गत शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली आणि शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दया काटे महाराज, शिक्षण तज्ञ मार्गदर्शक भगवान तात्या मोरे, शाळा समितीचे उपाध्यक्ष रमाकांत बरीदे, केंद्रप्रमुख विष्णू ढवळे अनिरुद्ध भाऊ कातारे, गोवर्धन महाराज उगले, मुख्याध्यापक, गणेश राठोड, पर्यवेक्षक सतीश नाईक यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित अभ्यास, शिस्त, स्वच्छता आणि नैतिक मूल्यांचे पालन करण्याचा संदेश दिला. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दया काटे महाराज यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पालक, शिक्षक आणि समाज यांनी एकत्रितपणे कार्य करण्याची गरज व्यक्त केली. शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक बदलांसाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. मुख्याध्यापक गणेश राठोड यांनी शाळेच्या शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची माहिती उपस्थितांना दिली. तसेच पीएम श्री योजनेअंतर्गत शाळेत राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा कटिबद्ध असल्याचे सांगितले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी स्वागतगीते, देशभक्तीपर गीते आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणे करून उपस्थितांची मने जिंकली. पालकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. नवागत विद्यार्थ्यांना शाळेची ओळख करून देण्यात आली तसेच शालेय वातावरणाशी परिचित करून देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बरीदे मॅडम यांनी प्रभावीपणे केले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत, कार्यक्रमाची रूपरेषा आणि विविध उपक्रमांची माहिती त्यांनी आकर्षक शैलीत मांडली. कार्यक्रमाच्या शेवटी सुनील आखाडे यांनी आभार प्रदर्शन करून उपस्थित सर्व मान्यवर, पालक, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. शाळा प्रवेश उत्सव यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वी आणि संस्मरणीय ठरला. या उत्सवामुळे नवागत विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आत्मीयता निर्माण झाली असून पालकांमध्येही शाळेबद्दल विश्वास आणि समाधानाची भावना निर्माण झाली आहे. पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला, परतूर येथे संपन्न झालेला हा शाळा प्रवेश उत्सव विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची प्रेरणादायी सुरुवात ठरला असून शिक्षणाच्या प्रसारासाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या ध्येयासाठी शाळेची बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

## ०१ ऑगस्टपर्यंत...

व्यवस्थेच्या थोबाडीत मारलेली चपराक आहे. २० वर्षे कायदा असूनही जनता माहितीसाठी हेलपाटे मारत होती, अपील करत होती. शासनाचा वेळ आणि जनतेचा पैसा वाया जात होता. आता एकही अधिकारी माहिती नाही म्हणू शकणार नाही. माहिती फलकावर लावावीच लागेल.''

''जिल्हाधिकारी कार्यालयाने अतिशय सकारात्मतेने आदेश काढला आहे. आता पर्यंत स्वत:होऊन हे करायला पाहिजे होते. असो माझी कलम ४ ची अंमल बजावणीची मागणी मान्य करावीच लागली. हा प्रशासनाचा पराभव आहे.''अंमलबजावणी झाल्यास कार्यालयीन शिस्त नक्कि येईल. कोणत्या कर्मचाऱ्याकडे कोणते काम व ते किती दिवसात पुर्ण होणार याची नागरीकांना माहिती होईल.सरकारी निधीतुन होणाऱ्या कामाची सर्व माहिती मिळेल असे बोरशे गुरुजी म्हणाले.

''यापुढे एकही दिवस जास्त खपवून घेणार नाही. ०१ ऑगस्ट २०२६ ला सायंकाळी ५ वाजेपर्यंत जालना जिल्ह्यातील प्रत्येक कार्यालयाबाहेर १७ मुद्द्यांचा बोर्ड दिसला पाहिजे. नाहीतर २५ ऑगस्टला उपोषण अटळ आहे. आणि या वेळी फक्त मी एकटा नसेन, तर संपूर्ण राज्य माझ्यासोबत असेल. हा आदेश म्हणजे फक्त सुरुवात आहे. माहिती अधिकाराची लढाई आता थेट जनतेच्या दारात पोहोचली आहे. प्रशासनाने काम केले नाही, तर परिणामांना तयार राहावे. माहिती अधिकार कार्यकर्ते ही यात सहभाग

## जालना जलकवच...

जलसुरक्षा, पीक विविधीकरण व शेतकरी उत्पन्नवाढ या जालना जलकवच अभियानाच्या उद्दिष्टांना पूरक ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. सदर कार्यक्रम, बदनापूर गटविकास अधिकारी ज्योती एन. राठोड, यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या संपन्न झाला. कार्यक्रमास बदनापुर तालुक्याचे रेशीम अधिकारी,डॉ.गोविंद गीते हे उपस्थीत होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पंचायत समिती बदनापूर, उमेद अभियान, कृषी विभाग व रेशीम विभाग यांनी समन्वयाने कार्य केले.

''कमी पाण्यात अधिक उत्पादन - रेशीम शेतीकडे वाटचाल'' या संदेशाद्वारे शेतकऱ्यांना जलसाक्षरता व पर्यायी शेती व्यवसायाबाबत जागरूक करण्याचा प्रयत्न या कार्यशाळेतून करण्यात आला.

## मान्सूनची दडी कायम...

चिंतेत असून दररोज आभाळाकडे आशेने पाहत आहेत.दुसरीकडे, वाढत्या उष्णतेमुळे नागरिकही हैराण झाले आहेत. दिवसभर कडक उन्हाचा तडाखा जाणवत असून वातावरणात उकाडा वाढला आहे. ग्रामीण भागातील विहिरी, कूपनलिका आणि इतर जलस्रोतांची पाणीपातळी कमी होत असल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पशुधनासाठी पाणी व चाऱ्याची उपलब्धता याबाबतही चिंता वाढत आहे.हवामान विभागाने पुढील काही दिवसांत पावसासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होण्याचा अंदाज व्यक्त केला असला तरी प्रत्यक्ष पाऊस कधी बरसेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अर्धा जून संपूनही आभाळ कोरडेच असल्याने शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण असून आता सर्वांना जोरदार पावसाची प्रतीक्षा लागली आहे.

## पीडितेला न्याय...

मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.यावेळी बोलताना सामाजिक कार्यकर्ता राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी सांगितले की, ''पीडितेला न्याय मिळणे आणि भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी शाळांमध्ये प्रभावी बालसुरक्षा यंत्रणा निर्माण करणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षा ही समाज आणि प्रशासनाची संयुक्त जबाबदारी आहे.''जालना शहरातील विद्यार्थिनीवरील कथित लैंगिक अत्याचार प्रकरणी निष्पक्ष चौकशी व विद्यार्थी सुरक्षेसाठी विशेष उपाययोजनांची मागणी करणारे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करताना सामाजिक कार्यकर्ता राहुल सत्यनारायणजी करनाडे व विजय ओमप्रकाश भगत.

# नीट परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज - जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी

**छत्रपती संभाजीनगर –प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात दिनांक २१ जून २०२६रोजी नीट (NEET) परीक्षा आयोजित करण्यात आली असून, ती सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सी ( NEET) यांनी सज्जता पूर्ण केली आहे. जिल्ह्यात एकूण ५० परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा संपन्न होणार असून, यासाठी प्रशासनाने नियोजन केले आहे सर्व नियुक्त अधिकारी यांनी समन्वयाने, जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडावे असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात नीट परीक्षेच्या आयोजनासंदर्भात समन्वय समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी विनय गौडा जी . जी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत परीक्षेचे नियोजन आणि सुरक्षेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यात ५० परीक्षा केंद्रांवर परीक्षा घेतली जाणार असून यात शहरात ४७ आणि ग्रामीण भागातील तीन परीक्षा केंद्र असणार आहे.जिल्ह्यातील १७ हजार ७३४ विद्यार्थी परीक्षा देणार आहे. दुपारी २:०० ते ५.१५ वाजता होणार आहे.प्रत्येक केंद्रासाठी स्वतंत्र केंद्र निरीक्षक, पोलीस बंदोबस्त अधिकारी आणि परीक्षा कार्यरत दंडाधिकारी यांच्या नियुक्ती करण्यात आली आहे.परीक्षा केंद्राच्या परिसरात सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाकडून ड्रोनद्वारे निरीक्षण केले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी रेल्वे स्टेशन आणि बस स्टॅन्ड येथे महानगर पालिकेच्या विशेष बस ची व्यवस्था करण्यात आली आहे. दिव्याग व्यक्ती साठी परीक्षा केंद्रावर मदत आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. परीक्षा केंद्राच्या बाहेर विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक पद्धतीने तपासणी आणि उपस्थिती घेतली जाणार आहे. या प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांनी वेळेवर उपस्थित राहणे गरजेचे आहे. परीक्षा देणाऱ्या सर्व उमेदवारांनी प्रवेशपत्रावर ( NEET) दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी सर्व नियुक्त अधिकारी आणि पोलीस प्रशासनाला आपापसात समन्वय ठेवून परीक्षा शांततेत आणि पारदर्शकपणे पार पाडण्याचे स्पष्ट निर्देश दिले. या बैठकीला पोलीस अधीक्षक (ग्रामीण) प्रकाश जाधव, पोलीस उपायुक्त श्री. रत्नाकर नवले, सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, नोडल अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, संतोष गोरड, विजय चव्हाण, प्रवीण फुलारी, शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांच्यासह महावितरण विभाग आणि परीक्षा समन्वयक उपस्थित होते.

# किशोरवयीन मुलांच्या उज्वल भविष्य आणि मानसिक आरोग्यासाठी योग्य मार्गदर्शन काळाची गरजः डॉ. गजानन खरात

**अंबड -प्रतिनिधी**

किशोरवयीन वयात मुलांच्या शरीरात आणि मनात अनेक बदल होत असतात. या नाजूक वयात त्यांना योग्य भावनिक आधार आणि करिअर मार्गदर्शनाची नितांत आवश्यकता असते, असे प्रतिपादन क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट आणि करिअर समुपदेशक डॉ. गजानन खरात यांनी केले. ते अंबड येथील आर. पी. इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित टीन माइंड्स, ब्राईट फ्युचर्सः अंडरस्टँडिंग ॲडोलसंट सायकॉलॉजी या विशेष सेमिनारमध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

मंगळवारी (१६ जून) संपन्न झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थी आणि शिक्षकांशी संवाद साधताना डॉ. खरात यांनी किशोरवयीन मुलांच्या मानसशास्त्रातील चार प्रमुख पैलूंवर सविस्तर प्रकाश टाकला:




**भावनिक वादळांचे व्यवस्थापन**

वयात येताना मुलांमध्ये होणाऱ्या शारीरिक बदलांमुळे भावनांमध्ये सतत चढ-उतार होत असतात. अचानक राग येणे किंवा उदास वाटणे या नैसर्गिक प्रक्रिया आहेत. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या भावना योग्य आणि शांत शब्दांत व्यक्त करायला शिकले पाहिजे, असा सल्ला त्यांनी दिला.

**आत्मसन्मान आणि सकारात्मक ओळख**

सध्याच्या सोशल मीडियाच्या युगात मुले स्वतःची तुलना इतरांशी करून न्यूनगंड बाळगतात. यावर बोलताना डॉ. खरात म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता वेगळी असते. आभासी जगाशी तुलना करण्यापेक्षा स्वतःमधील कलागुण ओळखून आत्मसन्मान वाढवण्यावर भर दिला पाहिजे.

**सामाजिक लवचिकता आणि कणखरपणा**

मित्रांच्या दबावाखाली ( ) येऊन चुकीचे निर्णय घेणे किंवा एखाद्या अपयशामुळे खचून जाणे या प्रवृत्ती आजकाल वाढल्या आहेत. यावर मात करण्यासाठी विद्यार्थ्यांनी ठामपणे नाही म्हणण्याचे धैर्य आणि अपयशातून पुन्हा नव्याने उभे राहण्याची सामाजिक लवचिकता अंगी बाळगणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**करिअरची योग्य निवड**

करिअर निवडताना केवळ इतरांचे अनुकरण करू नये. विद्यार्थ्याची बौद्धिक क्षमता (), कल (), त्याची आवड () आणि व्यक्तिमत्त्व ओळखूनच करिअरचे ध्येय निश्चित करावे. यासाठी शास्त्रीय पद्धतीने करिअर समुपदेशन घेणे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि मानसिक समाधानासाठी फायदेशीर ठरते, याकडे त्यांनी लक्ष वेधले. पालकांनी आपल्या इच्छा आकांक्षा आपल्या पाल्यावर न लाधता पाल्यांच्या इच्छा आकांक्षा आणि आवड निवडीचा विचार करून त्या त्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रोत्साहित करावे, त्यासोबतच अतिशय ताठर भूमिका असलेल्या पालकांनी आपल्या पाल्यांचा भावनिक, मानसिक विकास योग्य प्रकारे व्हावा यासाठी लवचिक भूमिका घेणे, आपल्या पाल्यांचे म्हणणे काय आहेत ते समजून घेणे आवश्यक आहे आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ. खरात यांनी केले. सदरील सेमिनार प्रसंगी आरपी इंटरनॅशनल स्कूलचे मुख्याध्यापक श्री. चंद्रशेखर जगताप सर, श्री. विनोद जैठमहाल सर, सर्व स्टाफ आणिविद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. किशोरवयीन मनातील गोंधळ दूर करून त्यांच्या सुरक्षित आणि यशस्वी भविष्याची दिशा ठरवण्यासाठी हा कार्यक्रम अत्यंत मार्गदर्शक ठरल्याची भावना उपस्थित शिक्षकांनी व्यक्त केली.

# वाचकांचे मनोगत करिता

विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना विद्यमान सरकारने अमलात आणली तेव्हा १५०० रूपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले होते.सरकारने आणलेल्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.सदर प्रस्ताव राज्यपालांच्या मंजुरीने अध्यादेश काढला होता.तातडीने अनुदान वितरीत करण्यात आले.सरकार जेव्हा नवीन योजना अंमलात आणणे तेव्हा त्याला राजमान्यता असते असा समज आहे.अनुदान बहिणीला देताना निकष ठरवले होते.बहिणी अनुराधा जागल्या त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी सरकार पक्षाला बहुमताने निवडून दिले.या योजनेच्या सुरवातीला २.४७ कोटी लाभार्थी होते.त्यांना प्रत्येकी १५००/- रुपये दिले.सरकारच्या नंतर लक्षात आले यात बोगस लाभार्थी आहेत.महिला व बालविकास विभागाने बॅक खाते आणि कौटुंबिक उत्पन्नाच्या माहितीच्या आधारे वगळणे सुरू केले.८१ लाख महिलांना वगळले.दिड वर्षांनंतर सरकारला साक्षात्कार झाला.हे सरकारचे अपयश असून बहिणींचा विश्वासघात.योजना सुरू करताना निकष ठरविण्यात आले होते.

मग, पुरुषांना अनुदान कसे दिले.तिजोरी रिकामी असताना नवीन योजना आणली गेली त्यांचे परिणाम पुढे दिसून आले.सरकारच्या आज्ञेवरून बहिणी पुढे आल्या त्यात त्यांची चूक काय? ८१ लाख बहिणी रुसल्यातर तर निवडणूकीत परिणाम दिसून येतील.

**महादेव गोळवसकर**
**मुंबई**
**९८६९४७६२०९**

# एल निनोमुळे पाणीटंचाईची शक्यता; गणेश मूर्तींच्या उंचीबाबत तातडीने निर्णय घेण्याची ॲड. अश्विनी धन्नावत यांची मागणी

**मुंबई - प्रतिनिधी**

यंदाच्या एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे देशात, विशेषतः महाराष्ट्रात, तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, आगामी गणेशोत्सवातील गणेश मूर्तींच्या उंचीबाबत तातडीने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, अशी मागणी ॲड. अश्विनी धन्नावत यांनी केली आहे.

प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय झाल्याने यावर्षी मान्सूनवर विपरीत परिणाम होऊन सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची भीती आहे. अनेक तज्ञांनी २०२६ मध्ये सुपर एल निनोचे संकट येण्याची शक्यता व्यक्त केली असून, त्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. राज्य सरकारने पाणीटंचाई टाळण्यासाठी धरणांतील सिंचनासाठीचे पाणी आवर्तन तात्काळ बंद करण्याचे निर्देश दिले असून, पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आदेश दिले आहेत.

गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील एक प्रमुख सण असून, सार्वजनिक मंडळांकडून मोठ्या उंचीच्या गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना करण्याची परंपरा आहे. मात्र, या मोठ्या मूर्तींच्या निर्मितीसाठी आणि विशेषतः विसर्जनासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवश्यकता असते. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता, अशा मूर्तींमुळे जलस्रोतांवर अतिरिक्त ताण येऊ शकतो.

**ॲड. अश्विनी धन्नावत यांचे निवेदनः**

ॲड. अश्विनी धन्नावत यांनी म्हटले आहे की, ''सध्या एल निनोमुळे पाणीटंचाईची शक्यता वर्तवली जात आहे. अशा परिस्थितीत, गणेश मूर्तींच्या उंचीबाबत तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. मोठ्या मूर्तींच्या निर्मिती आणि विसर्जनासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी लागते, ज्यामुळे पाणीटंचाई आणखी गंभीर होऊ शकते. सरकारने यावर त्वरित लक्ष देऊन योग्य मार्गदर्शक तत्त्वे जारी करावीत.''

यापूर्वी, कोविड-१९ महामारीच्या काळात सार्वजनिक गणेश मूर्तींची उंची ४ फूट आणि घरगुती मूर्तींची उंची २ फूट मर्यादित ठेवण्यात आली होती. तसेच, मुंबई उच्च न्यायालयाने ( ) पीओपी मूर्तींच्या विसर्जनासाठी नैसर्गिक जलस्रोताऐवजी कृत्रिम तलावांचा वापर अनिवार्य केला आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी काही मंडळांनी स्वेच्छेने मूर्तींची उंची कमी केल्याची उदाहरणेही आहेत. या पार्श्वभूमीवर, यंदाच्या पाणीटंचाईच्या धोक्यामुळे प्रशासनाने गणेश मूर्तींच्या उंचीबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जारी करणे आवश्यक आहे, जेणेकरून पाण्याचा अपव्यय टाळता येईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल.

राज्य सरकार आणि स्थानिक प्रशासनाने तातडीने यावर विचार करून गणेशोत्सव मंडळांसाठी आणि नागरिकांसाठी मूर्तींच्या उंचीसंदर्भात स्पष्ट आदेश काढणे अपेक्षित आहे. यामुळे पाणी व्यवस्थापनात मदत होईल आणि संभाव्य पाणीसंकटाचा सामना करण्यासाठी सामूहिक प्रयत्न शक्य होतील.

# विविध उपक्रमांनी श्री हिंदू सूर्य महाराणा प्रतापसिंह जयंती उत्साहात साजरी

**जाफराबाद -प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे प्रेरणास्थान व शौर्य, पराक्रम आणि स्वाभिमानाचे प्रतीक असलेले श्री हिंदू सूर्य महाराणा प्रतापसिंह यांची जयंती जाफराबाद येथे मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय नाना परिहार हे होते. यावेळी नगरसेवक सुरेश दिवटे, माजी नगराध्यक्ष संजय लहाने, नायब तहसीलदार श्री मिसाळ साहेब, पोलीस निरीक्षक सतीश जाधव , नगराध्यक्ष दिपक पाटील वाकडे, शिवसेना जिल्हा प्रमुख मनीष श्रीवास्तव, उपजिल्हाप्रमुख रमेश गव्हाड, दिलीप सिंह गौतम आदी मान्यवरांनी मार्गदर्शक व मनोगत व्यक्त केले.यावेळी उपस्थित मान्यवरांनी महाराणा प्रताप यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या शौर्य, राष्ट्रभक्ती, स्वाभिमान आणि त्यागमय जीवनातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विजय नाना परिहार यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात महाराणा प्रताप यांच्या संघर्षमय जीवनाचा आढावा घेत त्यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी कॉंग्रेस प्रदेश उपाध्यक्ष पर्यावरण विभाग सुरेश गवळी, सुधीर पाटील, नगरसेवक अनिल बोर्डे, रविराज भैय्या जयस्वाल, रमेश धवलीया,भगवानसिंह इंगळे, पत्रकार प्रकाश मिरगे, पत्रकार मोहन मुळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष मुकेश भारद्वाज,प्रविण बडजावत, नगरसेवक दामू अण्णा वैद्य, सुरेश पाटील वाकडे, रवी हिवाळे, संदीप पाटील वाकडे, संजय सिंह गौतम, किशोर सिंग बायस, दुर्गेश सिंग कच्छवाह, मनोज बायस ,मुजिब सर, शहीद भाई, बबनसिंग बायस, राजेंद्र सिंह गौतम, अमोल पडघन, ॲड .विष्णु शिंदे, गव्हाणे साहेब, ज्ञानेश्वर शिंदे, भोपळे साहेब, गजबसिंग घुसिंगे, गजेंद्र सिंह कछवाह, देवीसिंग बायस ,संजय खंडेलवाल, योगेश नगरीया, राजू ताटू, अर्जुन खंडेलवाल, कृष्णा दुनगहू, संतोषसिंह बायस, प्रकाश कछवाह, मयूर बायस, ईश्वर परिहार, सुभाष लोळगे, अनिल मुळे, केदार गौतम, विजय बिसेन, प्रमोद राजपूत, दीपक भैया ठाकूर, बाला गौतम, गगन ठाकूर, सौगन बिसेन, कुलदीप बायस, आकाश कछवाह, प्रणव गौतम, गोपाल ढाकीफळे, अनिरुद्ध मुळे, सचिन बायस, पंढरी परिहार, योगेश वाकडे, सोनू कछवाह,बबलू जोडीवाले यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

# जळकोट येथे पंचायत समितीत महाराणा प्रताप सिंह जयंती साजरी

**जळकोट । प्रतिनिधी**

पंचायत समिती जळकोट येथे आज महाराणा प्रताप सिंह यांची जयंती साजरी करण्यात आली




यावेळी कोसंबे संभाजी जळकोट पंचायत समिती सदस्य केंद्रे राजेश,संजय सूर्यवंशी ,उप अभियंता वीरभद्र स्वामी, सहाय्यक गट विकास अधिकारी रोहित देडगे,सहाय्यक प्रशासन अधिकारी सचिन काडवादे यांच्या हस्ते महाराणा प्रताप सिंह यांच्या प्रतिमे चे पूजन करण्यात आले.

पंचायत समिती जळकोट कार्यालयातील ,भीमाशंकर स्वामी कनिष्ठ प्रशासन आधिकारी,विस्तार अधिकारी , आनंद शृंगारे जयवंत कोनाले शिवकांत पटवारी , शाखा अभियंता मठपती,घोलपे संजय, कनिष्ठ लेखा अधिकारी इंगळे , वरिष्ठ सहायक निखिल पांचाळ , लक्ष्मण ढोबळे, ,केंद्रे संभाजी, शांतवीर कासनाले,सुनील तोडसम , ,संजय घोरपडे, सतीश हाळे, इंद्राळे,मैनुद्दीन शेख,विशाल तिवघाळे, दत्तात्रय जायेवार,यांची उपस्थिती होती

# १८ जून राणी लक्ष्मीबाई पुण्यतिथी

विषयः- झाशीची राणी लक्ष्मीबाई; तळपत्या सुर्याचा तेजोमय प्रकाश.

आज इतिहासातच नाही तर जगात झाशीची राणी लक्ष्मीबाईचे नाव मोठ्या स्वाभिमानाने घेतल्या जाते. कारण कमी वयात देशासाठी लढा उभारून इंग्रजांशी दोन-दोन हात करून संघर्ष केला यात लक्ष्मीबाईची महानता अजरामर आहे.झाशीची राणी लक्ष्मीबाईचा जन्म मोरोपंत तांबे आणि भागीरथीबाई यांच्या पोटी उत्तर प्रदेशातील काशी(वाराणसी )येथे १९नोव्हेंबर १८३५ ला झाला. लक्ष्मीबाईचे मुळ नाव मणिकर्णिका होते. लक्ष्मीबाईचे वडील मोरोपंत तांबे हे पुण्याच्या पेशव्यांच्या आश्रयाला होते.मुळचे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील गुढे गावचे होते.नंतर काशी येथे स्थायी झाले व तिथे लक्ष्मीबाईंचा जन्म झाला. उत्तर भारतातील झाशी राज्यातील महाराज गंगाधरराव नेवलेकर यांच्याशी १९ में १८४२ ला विवाह झाला आणि लक्ष्मीबाई झाशीची राणी बनली.परंतु २१ नोव्हेंबर १८५३ रोजी महाराज गंगाधरराव नेवलेकर यांचे निधन झाले तेव्हा राणी अवघ्या १८ वर्षांच्या होत्या.तथापि राणीने आपला संयम आणि धैर्य राखले आणि बाळ दामोदरच्या लहान वयामुळे राणी लक्ष्मीबाईने राज्याचा ताबा घेतला. लक्ष्मीबाई एकोणिसाव्या शतकातील झाशी राज्याच्या महाराणी होत्या. १८५७ च्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विरूध्द झालेल्या स्वातंत्र्य उठावातील एक अग्रगण्य तेजस्वी, महाप्रतापी आणि कमी वयातील बहादुर सेनानी होत्या.

७ मार्च १८५४ रोजी ब्रिटिश सरकारने झाशीला ब्रिटिश साम्राज्यात सामील होण्याचे आदेश देणारे अधिकृत राजपत्र जारी केले.ब्रिटीश अधिकारी ॲलिसचा हा आदेश राणी लक्ष्मीबाईने ऐकल्यावर तळ पायाची आग मस्तकात गेली व आदेश पाळण्यास नकार दिला आणि ''मी झाशी देणार नाही'' असे जाहीर केले व झाशी हे बंडाचे केंद्र बनले.सर ह्यु रोज यांनी २२ मे १८५८ रोजी काल्पीवर हल्ला केला.परंतु राणी लक्ष्मीबाईने आपल्या पराक्रमाने ब्रिटिशांना पराभूत केले. यामुळे ब्रिटिश तिलमीला झाले व पुन्हा काल्पीवर हल्ला



केला आणि राणीचा पराभव झाला.या पराभवानंतर रावसाहेब पेशवे,बांद्याचे नवाब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई आणि इतर महत्वाचे सैनिक गोपाळपूरला जमले.यावेळी राणीने ग्वाल्हेर ताब्यात घेण्याचा सल्ला दिला. लक्ष्मीबाई आणि तात्या टोपे यांनी बंडखोर सैन्यासह ग्वाल्हेरवर कूच केले व ग्वाल्हेरचा किल्ला काबीज केला आणि ग्वाल्हेरचे राज्य पेशव्यांच्या ताब्यात दिले.१८५७ चा उठाव हा संपूर्ण हिंदुस्थानात झाला. त्याचप्रमाणे ५ जून १८५७ ला झाशीतही शिपायांचा उद्रेक झाला व केवळ ३५ शिपायांनी इंग्रजांना पळवून सोडले.२२ में १८५८च्या कल्पीच्या लढाईनंतर राणी ३०-३१ मे १८५८ रोजी ग्वाल्हेरला आल्या.तेथे स्वस्त न बसता लक्ष्मीबाईंनी आपल्या सैन्याची कवायत नियमित सुरू ठेवली. इंग्रजांना रोखण्यासाठी कशा प्रकारे मोर्चे बांधणी करावी या विषयी त्यांनी चर्चा केली. अचानक याचवेळी १७ जून १८५८ रोजी ब्रिटिश अधिकारी स्मिथ सैन्यासह ग्वाल्हेरच्या अगदी जवळ ''कोटा की सराय'' येथे येऊन पोहोचला व त्यांने त्वरित हल्ला चढवला.अशा परिस्थितीत लक्ष्मीबाईने रणांगणात धाव घेतली आणि लक्ष्मीबाईने ब्रिटिश शिपायांना तलवारीने सपासप कापत सामोरं जात होत्या.

विजेसारख्या तळपणाऱ्या राणीकडे पाहून त्यांच्या सैनिकांमध्ये आणखी जोश आला व ब्रिटिश सैन्याला छाटुन काढले.अशा परिस्थितीत इंग्रज अधिकारी स्मिथचे सैन्य मागे हटणार होते.परंतु घात झाला आणि नव्या दमाची एक फौज बाजूच्या टेकडीवरून चालून आली.अशा परिस्थितीत आपला टिकाव लागणार नाही हे पाहुन स्वारांनिशी बाहेर पडल्या.थोडे पुढे जाताच एका ओढ्यापाशी त्यांचा ''राजरत्न'' नावाचा (हा नवीन घोडा होता) घोडा अडला.नेहमीचा ''सारंगी'' नावाचा घोडा शेवटच्या लढाईत त्यांच्याबरोबर नव्हता.अशा परिस्थितीत काही केल्या घोडा ओढा ओलांडत नव्हता. इंग्रजांशी लढत असतांना राणी लक्ष्मीबाई रक्तबंबाळ होऊन घोड्यावरून खाली कोसळल्या.परंतु पुरूषी वेशात असलेल्या राणी लक्ष्मीबाई यांना इंग्रज ओळखू शकले नाहीत व इंग्रज पुढे निघून गेले.घायाळ झालेल्या राणी लक्ष्मीबाई यांना सेवक रामचंद्र देशमुखांनी फुलबाग येथील बाबा गंगादास यांच्या मठात आणले.आपला देह इंग्रजांच्या हाती लागू नये अशी त्यांची इच्छा होती. फुलबाग येथे बाबा गंगादास यांच्या मठात तात्या टोपे, रामचंद्रराव देशमुख, काशीबाई कुनविन, गुलमोहम्मद, बांदा नवाब बहादुर अली आणि दामोदर राव यांनी मुखाग्नी दिली.अशा प्रकारे महान योध्द्या राणी लक्ष्मीबाई यांनी वीरमरण पत्करून वयाच्या तेविसाव्या वर्षी प्राणज्योत मालवली.राणी लक्ष्मीबाईचा स्वर्गवास १७ जून १८५८ ला झाला.परंतु इंग्रज सरकारने राणी लक्ष्मीबाईना १८ जूनला मृत घोषित केले त्यामुळे दरवर्षी १८ जूनला पुण्यतिथी साजरी करण्यात येते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश -पाताळ आहे तोपर्यंत झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे नाव अमर राहील. देशात झाशीची राणी लक्ष्मीबाई याची प्रेरणा निरंतर आपल्या हृदयात रहावी यासाठी त्यांच्या पुण्यतिथी निमित्त देशात वृक्ष लागवड व्हायला हवी.

कारण असे जर झाले तर आपल्याला प्रत्येक झाडाच्या पानांत, फुलात,फळात झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे दर्शन अवश्य होईल.राणी लक्ष्मीबाईना माझा कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# जालन्यात एलसीबीचा मोठा भंडाफोड; रुपम वाईन्सच्या मालकासह दोघांविरुद्ध गुन्हा ६.७२ लाखांचा मुद्देमाल जप्त

## अवैध दारू वाहतूक करणारा महिंद्रा जितो टेम्पो पोलिसांच्या ताब्यात

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवैध दारू वाहतूक आणि बेकायदेशीर मद्य व्यवसायाविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेत जालना पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेला (एलसीबी) मोठे यश मिळाले आहे. गोपनीय माहितीच्या आधारे राबविण्यात आलेल्या धाडसी कारवाईत विदेशी व देशी दारूचा मोठा साठा जप्त करण्यात आला असून, या प्रकरणात 'रुपम वाईन्स'च्या मालकासह दोघांविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत पोलिसांनी दारूसाठा आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले वाहन मिळून तब्बल ६ लाख ७२ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जिल्ह्यातील अवैध मद्य वाहतूक रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून सुरू असलेल्या कारवाईमुळे मद्य तस्करी करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

**गोपनीय माहितीवरून सापळा**

पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधु यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या आदेशानुसार मंगळवारी (दि. १६



जून) दुपारी सुमारे ४.१० वाजेच्या सुमारास एलसीबीच्या पथकाला महत्त्वाची माहिती प्राप्त झाली. नवीन मोंढा परिसरातून एका लोडिंग वाहनाद्वारे मोठ्या प्रमाणात अवैध दारूची वाहतूक होत असल्याचे समजताच पोलिसांनी तात्काळ मोती बारसमोर सापळा रचला.

काही वेळातच संशयास्पद हालचाली करणारे पांढऱ्या रंगाचे महिंद्रा जितो (क्र. -२१--७५५९) हे वाहन तेथे येताच पोलिसांनी त्यास अडवून कसून तपासणी केली. तपासणीदरम्यान वाहनामध्ये मोठ्या प्रमाणात विदेशी आणि देशी दारूचा साठा आढळून आला. संबंधितांकडे वाहतुकीसंदर्भातील आवश्यक कागदपत्रे व परवानगी नसल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी संपूर्ण माल जप्त केला.

**विदेशी दारू आणि बिअरचा मोठा साठा**

झडतीदरम्यान वाहनातून विविध नामांकित ब्रँडच्या विदेशी दारू व बिअरचे बॉक्स आढळून आले. यात रॉयल स्टॅगचे १३ बॉक्स, इम्पेरिअल ब्ल्यूचे ४ बॉक्स, रॉयल चॅलेंज, मॅकडॉवेल्स नं. १, स्टर्लिंग रिझर्व्ह ७, मॅजिक मोमेंट्स, ग्रँड मास्टर यांसह विविध ब्रँडच्या तब्बल ६१ बॉक्स बिअरचा समावेश आहे.

या विदेशी मद्य व बिअर साठ्याची एकूण किंमत ५ लाख ११ हजार ४४० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

**देशी दारूचाही साठा जप्त**

विदेशी दारूसह वाहनातून देशी दारूचेही बॉक्स आढळून आले. यात सखु संत्रा टँगो आणि भिंगरी संत्रा या ब्रँडच्या देशी दारूचा समावेश असून त्याची किंमत ११ हजार ५२० रुपये इतकी आहे.

याशिवाय वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले महिंद्रा जितो लोडिंग वाहन, ज्याची अंदाजे किंमत १ लाख ५० हजार रुपये आहे, तेही जप्त करण्यात आले.

**दोघांविरुद्ध गुन्हा दाखल**

या प्रकरणात पोलिसांनी नोहा दिपक चव्हाण (वय २८, रा. शकुंतला नगर, मंठा चौफुली, जालना) याच्यासह 'रुपम वाईन्स'चे मालक राम *(पान २ वर)*

# पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला परतूर येथे शाळा प्रवेश उत्सव उत्साहात संपन्न

**परतूर -प्रतिनिधी**

शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत अधिकार असून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत आवड निर्माण करण्यासाठी तसेच नवागत विद्यार्थ्यांचे शाळेत आनंददायी वातावरणात स्वागत करण्याच्या उद्देशाने पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला, परतूर येथे शाळा प्रवेश उत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नव्याने प्रवेश घेतलेल्या इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे फुलहार, पुष्पगुच्छ आणि टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरणात प्रवेश देण्यात आला. शाळेच्या प्रांगणात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. रंगीबेरंगी सजावट,



स्वागत फलक आणि विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद यामुळे कार्यक्रमाला विशेष शोभा प्राप्त झाली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी, पद्माकर गायकवाड. तसेच गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती चे रविकुमार कवडे. उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आलेली मोफत पाठ्यपुस्तके आणि मोफत गणवेशांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्याने त्यांच्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना नियमितपणे शाळेत उपस्थित राहण्याचे, अभ्यासाबरोबरच क्रीडा, कला आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यांनी पालकांनाही आपल्या पाल्यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्याचे सांगितले. ''आजचा विद्यार्थी हा उद्याचा जबाबदार नागरिक आहे. शिक्षणामुळेच व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो,'' असे प्रतिपादन त्यांनी केले.

गटशिक्षणाधिकारी रविकुमार कवडे यांनी शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांची माहिती देताना विद्यार्थ्यांनी उपलब्ध सुविधांचा लाभ घेऊन गुणवत्तापूर्ण *(पान २ वर)*

आमरण उपोषणाच्या इशाऱ्यानंतर प्रशासन नमले!

# ०1 ऑगस्टपर्यंत अंमलबजावणी न झाल्यास पुन्हा रणशिंग

## जिल्हाधिकारी कार्यालयाचा आदेश म्हणजे नागरिकांचा विजय, पण अजून लढाई बाकी- बोरशे गुरुजी

**दत्ता देशमुख**

माहिती अधिकार कायद्याला पायदळी तुडवणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते श्री. कडुबा विनायकराव बोरशे गुरुजी यांनी दि. ०४/०६/२०२६ रोजी आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. या इशाऱ्यानंतर प्रशासनाला जाग आली आणि दि. ०७/०६/२०२६ रोजी जावक क्र. १४७१ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी अखेर आदेश काढलाच.

**प्रशासनाला दिलेली अंतिम मुदत आणि आदेशातील ठळक बाबी:**

१. माहिति अधिकार कायदा २००५ कलम ४(१)() ची आठवण: २० वर्षांपासून धूळ खात पडलेल्या कायद्याची प्रशासनाला उपोषणाच्या धाकाने आठवण करून द्यावी लागली. या कलमानुसार १ ते १७ मुद्द्यांची माहिती स्वतःहून वेबसाईट व कार्यालयाबाहेर फलकावर लावणे बंधनकारक आहे, असे आदेशात ठणकावून सांगितले आहे.

२. ०१/०८/२०२६ ची



डेडलाईन: सर्व विभाग प्रमुख, उपविभागीय अधिकारी व तहसिलदारांना ६० दिवसांची अंतिम मुदत देण्यात आली आहे. या तारखेपर्यंत प्रत्येक कार्यालयाबाहेर माहितीचा फलक झळकलाच पाहिजे.

३. २५/०८/२०२६ - उपोषणाचा दिवस: जर प्रशासनाने टाळाटाळ केली, तर २५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता करजगांव ग्रामपंचायतसमोर आमरण उपोषण सुरू होणार, हे प्रशासनाने लेखी मान्य केले आहे.

**श्री. कडुबा बोरशे गुरुजींचा हल्लाबोल:**

''हा आदेश म्हणजे माझा वैयक्तिक विजय नाही, तर माहिती लपवून भ्रष्टाचार करणाऱ्या *(पान २ वर)*

# जालना जलकवच अभियानांतर्गत बदनापूर येथे रेशीम शेती कार्यशाळा संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

जालना जलकवच अभियान - २०२६ व आकांक्षित तालुका कार्यक्रम अंतर्गत आज पंचायत समिती सभागृह, बदनापूर येथे रेशीम शेती विषयक कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. जलसुरक्षा, पीक विविधीकरण व शेतकरी उत्पन्नवाढ या उद्दिष्टांना केंद्रस्थानी ठेवून सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

एल-निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या जालना जलकवच अभियान अंतर्गत कमी पाण्यावर आधारित, शाश्वत व उत्पन्नवाढीस पूरक अशा पर्यायी शेती व्यवसायांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यशाळेस तालुक्यातील शेतकरी, शेतकरी गट, महिला बचत गट सदस्य, उमेद अभियानातील महिला, कृषी सखी, युवक-युवती तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते यांनी रेशीम शेतीचे आर्थिक महत्त्व, तुती लागवड, रेशीम किडे संगोपन, शासकीय अनुदान योजना, बाजारपेठ उपलब्धता तसेच रोजगार निर्मितीच्या संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच डॉ. अंकुश गाडगे, केंद्रीय रेशीम बोर्ड यांनी रेशीम शेतीतील तांत्रिक बाबी, उत्पादन व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच शेतकऱ्यांसाठी उपलब्ध विविध योजनांची माहिती उपस्थितांना दिली.

ज्योती एन. राठोड गट विकास अधिकारी पंचायत समिती बदनापूर यांनी, जलकवच अभियान अंतर्गत येणारे सप्त कार्यक्रम विषयी माहिती दिली व शाश्वत उत्पादन देणारी रेशीम शेतीचा अवलंब करण्याचा आज महिलांनी निर्णय घ्यावा व आपले आपले उत्पादन वाढवावे असे अवाहन केले

रेशीम शेती ही कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारी, ग्रामीण भागात रोजगार निर्मितीस चालना देणारी तसेच महिलांसाठीही उपयुक्त अशी व्यवसायाभिमुख शेती पद्धती असल्याने *(पान २ वर)*

# जिल्हाधिकारी कार्यालयात महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन



**जालना - प्रतिनिधी**


महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात तहसिलदार अनिल नव्हाते यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी नायब तहसिलदार तुषार निकम, सतिष तायडे, दिपाली राऊत, संपदा कुलकर्णी, शिल्पा मगरे, स्वाती राठोड, आदिती कुलकर्णी, संतोष पगार, अतुल केदार, गजानन खांडेभराड, अनिल काळुंके, कुंदा पाटील, संतोष वाढे, बी.ए. कांबळे तसेच प्रशासकीय इमारतीमधील विविध कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# मान्सूनची दडी कायम; अर्धा जून उलटला तरी पाऊस गायबकोरड्या आभाळामुळे शेतकरी चिंतेत

**सिंधीकाळेगाव -प्रतिनिधी**

जून महिना अर्धा संपत आला तरी जालना भागांमध्ये अद्यापही मान्सूनचा अपेक्षित पाऊस झालेला नाही. आकाशात अधूनमधून ढगांची गर्दी होत असली तरी पावसाचा थेंबही न पडल्याने शेतकरी वर्गासह सर्वसामान्य नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. यंदा मान्सून वेळेत दाखल होईल आणि पेरणीच्या कामांना वेग येईल, अशी अपेक्षा होती.अर्धा जून संपत आला तरी पाऊस नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. त्यातच




बियाणे व खतांच्या किमती वाढल्याने शेतीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पेरण्या रखडल्याने आर्थिक संकट अधिक गडद होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत. पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामाच्या तयारीवर परिणाम होताना दिसत आहे.शेतकऱ्यांनी आधीच शेत मशागतीची कामे पूर्ण केली आहे. अनेक शेतकरी पावसाच्या पहिल्या सरींची वाट पाहत आहेत. पाऊस उशिरा झाल्यास पेरण्या लांबण्याची शक्यता असून त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होऊ शकतो. त्यामुळे शेतकरी *(पान २ वर)*

# शासकीय वसतीगृहासाठी इमारत भाडे तत्त्वावर देण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह सुरु करावयाचे आहे त्या करीता जालना शहरात/मध्यवर्ती भागात मुबलक पाणी, वीज, स्नानगृह, शौचालय सर्व सोई सुविधा युक्त इमारत अंदाजे ६ ते ७ हजार स्वेअर फुट भाडेतत्त्वावर घेणे आहे तरी इच्छुक मालकांनी गृहपाल आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह संजय यांच्याकडे साधण्याचे आवाहन गृहपाल यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता भ्रमणध्वनी क्रमांक ९५४५४९५११८

# पीडितेला न्याय, विद्यार्थ्यांना सुरक्षा

## सामाजिक कार्यकर्ता राहुल सत्यनारायणजी करनाडे यांचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व शिक्षण विभागाला निवेदन

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील एका शाळेतील विद्यार्थिनीवरील कथित लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ता राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय तसेच शिक्षण विभागाकडे निवेदन सादर करून निष्पक्ष चौकशी, पीडितेला न्याय व जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी विशेष उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.सादर करण्यात आलेल्या निवेदनात नमूद




करण्यात आले आहे की, शाळा या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबतच सुरक्षितता, संरक्षण व व्यक्तिमत्त्व विकासाची केंद्रे आहेत. अशा ठिकाणी घडणाऱ्या गंभीर घटनांमुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत असून या प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक व सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.निवेदनाद्वारे पीडित विद्यार्थिनीची ओळख, गोपनीयता व सन्मान यांचे संरक्षण करण्याबरोबरच दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये समित्या, बाल संरक्षण समित्या, तक्रार निवारण यंत्रणा, शिक्षकांची पोलीस पडताळणी, बालसुरक्षा लेखापरीक्षण ( ) व विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम राबविण्याची मागणी करण्यात आली आहे.याशिवाय प्रशासनाने या संदर्भात कोणती कार्यवाही केली आहे तसेच भविष्यात कोणती कार्यवाही करणार आहे याची माहिती लेखी स्वरूपात देण्यात यावी, अशी *(पान २ वर)*

मंदिर महासंघ व वारकरी संघटना यांचा इशारा!

# मूर्तीला जबरदस्तीने रासायनिक लेपन करत असल्याचे प्रकरण!

## पंढरपूर येथील श्री विठ्ठलाच्या मूर्तीला हानी पोहोचल्यास मंदिरे समिती व पुरातत्त्व विभागावर फौजदारी खटला दाखल करू !

**पंढरपूर - प्रतिनिधी**

पंढरपूर येथील कोट्यवधी हिंदूंचे आराध्यदैवत असलेल्या 'स्वयंभू' श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीवर पुरातत्त्व विभागाद्वारे २३-२४ जून रोजी नियोजित असलेल्या रासायनिक वज्रलेपन प्रक्रियेला (/) वारकरी संप्रदाय आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाने कडाडून विरोध केला आहे. कोरोना काळात केलेले लेपन पुढील १० वर्षे टिकेल असा दावा प्रशासनाने केला होता; मात्र अवघ्या ४-५ वर्षांतच मूर्तीला पुन्हा लेपनाची आवश्यकता भासणे हे या रासायनिक प्रक्रियेचे अपयश सिद्ध करते.

तब्बल २८ युगे विटेवर सुखरूप उभा असणाऱ्या पांडुरंगाच्या मूर्तीच्या पायाला कोरोना टाळेबंदीच्या काळात खड्डा कसा पडला आणि श्री रुक्मिणीमातेचे पाय का खराब झाले, याचे कोणतेही शास्त्रीय उत्तर अद्याप मंदिर समिती किंवा पुरातत्त्व विभागाला देता आलेले नाही.

कृत्रिम रसायनांमुळे पाषाणाचे नैसर्गिक श्वसन रोखले जाऊन मूर्ती आतून ठिसूळ होण्याचा गंभीर धोका असल्याने, वारकरी संत-महंत आणि मूर्तीशास्त्रज्ञांना विश्वासात न घेता प्रशासनाने एकतर्फी पाऊल उचलल्यास संपूर्ण महाराष्ट्रात जनक्षोभ निर्माण होईल. इतके झाल्यावरही रासायनिक लेपन प्रक्रिया लादण्याचा प्रयत्न झाल्यास आम्ही श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती आणि पुरातत्व विभाग यांच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल करू, असा इशारा महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी दिला पत्रकार परिषदेत दिला आहे. या संदर्भातील निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी व मंदिरे समिती यांना सादर करण्यात आले आहे. या प्रसंगी वारकरी पाईक संघाचे ह.भ.प. रामकृष्ण हनुमंत महाराज वीर, प्रज्ञापुरी ज्ञानपीठ अक्कलकोटचे पीठासीन धर्माधिकारी श्री. प्रसाद पंडित, हिंदुराष्ट्र समन्वय समितीचे जिल्हा संयोजक श्री. चंद्रकांत रमणशेट्टी, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे श्री. विनोद रसाळ आणि हिंदु जनजागृती समितीचे श्री. राजन बुणगे उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.